दूरध्वनी क्रमांक:– ०२०–२५५०१०९३.
अपिल प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता
पथ कार्यालय, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर,पुणे–४११ ००५.
जा.क्र.:– पथ/माअ/
दिनांक :–

अपिल प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पथ) यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका
अपिल क्रमाक़:– पथ/ माअ/अपिल क्र. २० दि. ६/१०/२०१६.

अपिलकर्त्याचे नांव व पत्ता:
**श्री. अविनाश रामचंद्र रिठे**
डावखरे बिल्डींग, जाधव वस्ती,
कळसगांव, आळंदी रोड,
पुणे ४११०१५.
जन माहिती अधिकायाचे नांव व हुद्दा:–
**श्री. हरिदास प्रदिप**
जन माहिती अधिकारी तथा
उप अभियंता (पथ)
पुणे महानगरपालिका.

**श्री. अविनाश रामचंद्र रिठे**
अपिलार्थी
विरूध्द
जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (पथ) पुणे महानगरपालिका.

---

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चेकलम १९(१) अन्वये अपिल

अपिलकर्ता यांनी दि. १४/९/२०१६ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पथ) कार्यालय, पुणे महानगरपलिका यांचेकडे अर्ज करून माहिती मागितली होती.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| १४/९/२०१६ | १४/१०/२०१६ | – | – | ३०/९/२०१६ |

जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १०/११/२०१६ रोजी प्रथम अपिल अर्ज दाखल केला.

| माहिती अधिकारातील अपिल अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | प्रथम अपिलाच्या विलंबाबत निवेदन दिले आहे का? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| १०/११/२०१६ | १०/११/२०१६ | होय | लागू नाही. | – |

सदर अपिलाची सुनावणी दिनांक १०/११/२०१६ रोजी दुपारी ४.०० वाजता घेण्यात आली.
सुनावणीस अपिलकर्ता:– अनुपस्थित.
सुनावणीस जन माहिती अधिकारी :–श्री. हरिदास प्रदीप
जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशिल पुढील प्रमाणे :–

विवेचन

अपिलकर्ता यांनी दि. १४/९/१६ रोजी जनमाहिती अधिकारी कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ च्या अनुषगांने माहिती मिळविण्यासाठी अर्ज केला होता. तथापि जनमाहिती अधिकारी यांजकडून माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्जदारास माहिती अर्धवट स्वरुपाची असल्याने तसेच फॉरमेट मध्ये नसल्याने अर्जदार यांनी दुरुस्तीबाबत मागणी केली आहे. त्यांनी प्रथम अपिल दि. १०/११/२०१६ रोजी दाखल केले. प्रथम अपिलाबाबत दि.१०/११/२०१६ रोजी दुपारी ४.०० वाजता अपिल सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता श्री.अविनाश रामचंद्र रिठे हे अनुपस्थित होत त्यामुळे दि. ३०/११/२०१६ रोजी दुपारी ४.०० वाजता पुन्हा दुबारा सुनावणी घेण्यात आली. प्र. उप अभियंता (पथ) श्री. प्रदीप हरिदास यांचे उपस्थितीत अपिल सुनावणी घेण्यात आली. त्यांनी पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागाकडील गेल्या ५ वर्षातील माहिती घेतली असता कोणत्याही कंत्राटदाराला काळ्या यादीत समाविष्ट केल्याची नोंद आढळत नाही असे सांगितले. सदर सुनावणीस दिलेल्या उत्तरास संबंधितांनी संमती दर्शविलेली आहे.

आदेश

पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागाकडील गेल्या ५ वर्षातील माहिती घेतली असता कोणत्याही कंत्राटदाराला काळ्या यादीत समाविष्ट केल्याची नोंद आढळत नाही. असे संबंधितास कळविण्यात यावे.

वरील आदेश पारित होवुन सदरचे प्रथम अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(अभिजीत डोंबे )
अपिल प्राधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (पथ)
पुणे महानगरपालिका

ठिकाण:–पुणे, दिनांक ६/१०/२०१६.

टिप:– १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवासाच्या मुदतीत मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे–१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

२. या आदेशाची प्रत पुणे मनपाच्या WWW.Punecorporationa.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.